# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्रं.मआविवि/पीआर/१३०१/२००९ **वृत्त प्रसिध्दीसाठी** दि. २५ सप्टेंबर २००९

# युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड (युनिसेफ) व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ बाल पोषणावर संयुक्त विद्यमाने कार्य करणार

**नाशिक (दि.२५) :** युनिसेफ व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ बाल पोषणावर संयुक्त विद्यमाने काम करणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या कुलगुरु मा.डॉ. मृदुला फडके यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना कुलगुरु मा.डॉ. मृदुला फडके या म्हणाल्या की, युनिसेफकडून यासाठी भरघोस अर्थसहाय्य मिळणार असून त्याद्वारे बाल पोषण व विकासाकरीता तसेच नवजात शिशु आणि बाल कुपोषण कार्यक्रमांच्या आयोजनासाठी वैद्यकीय महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी यांच्या प्रशिक्षणाकरीता संपूर्ण राज्यभर विविध चर्चासत्रे, कार्यशाळा इ. आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

त्या पुढे म्हणाल्या की, आरोग्य विद्यापीठ हे कुपोषणाच्या जागृतीसाठी अनेक प्रकारचे उपक्रम राबवित असून त्याचाच एक भाग म्हणून आरोग्य विद्यापीठ आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे काही दिवसांपूर्वी कुपोषणावर एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत राज्यातील कार्यरत विविध संस्थांचा सहभाग होता. यात प्रामुख्याने राज्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, ब्रेस्टफिडींग प्रमोशन नेटवर्क ऑफ इंडिया, स्टेट न्यूट्रिशन मिशन, आय.सी.डी.एस. काम करणार आहे. या कार्यशाळेमध्ये नवजात शिशु आणि बाल कुपोषणाच्या समस्येबाबत महाराष्ट्र राज्यात सकारात्मक बदल होत आहेत. परंतु ही समस्या शंभर टक्के सुटण्यासाठी व्यापक जनप्रबोधनाची गरज असून विविध आरोग्यशास्त्र महाविद्यालयांच्या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मदतीने या समस्येबाबत चळवळ उभी केली पाहिजे असा सूर कुपोषणाबाबतच्या विशेष कार्यशाळेत निघाला होता. यानंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे युनिसेफला विशेष प्रस्ताव पाठविला होता. यात विद्य ापीठातर्फे विभागीय स्तरावर मार्गदर्शनपर कार्यशाळा, पुर्नमार्गदर्शन कार्यशाळा आदी प्रकल्पांवर युनिसेफतर्फे मिळालेल्या निधीचा खर्च केला जाणार आहे.

विद्यापीठाने नवजात शिशु व बालरोग याबाबत एकात्मिक व्यवस्थापन, नवजात शिशु व बाल पोषण व प्रखर कुपोषण, जागतिक संघटना - वाढ निर्देशांक (Integrated Management of Neonatal & Childhood Illness – Infant & Young Child Nutrition – Severe Acute Malnutrition – WHO growth chart) यांचा एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाच्या अखेरच्या वर्षात

समाविष्ट करण्यात येणार असून भारतात पहिल्यांदाच एवढया विस्तृत प्रमाणात सदर विषयांचे समावेशन करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी सांगितली. यामध्ये नवजात शिशु व बाल आजार, त्यांचे कुपोषण व स्तनपान या मुद्यांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्याची विद्यापीठाची योजना आहे. या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या डॉक्टरांमुळे येत्या काही वर्षात कुपोषणाच्या समस्येवर मोठया प्रमाणावर आळा बसेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

विद्यापीठाद्वारे नियोजित कार्यशाळांद्वारे आधुनिक शिक्षण घेणारे तज्ज्ञ समाजातील इतर खाजगी डॉक्टरांना, शासकीय सेवेतील डॉक्टरांना व जनतेतील संबंधीत घटकांना वेळोवेळी मार्गदर्शन करतील. जेणेकरुन कमी अवधीत व कमी मनुष्यबळामध्ये कुपोषणावर अधिक व्यापकतेने काम करणे व कुपोषणाचा दुष्परिणामांपासून समाजाला दूर नेणे शक्य होईल. जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ यांच्या मार्गदर्शनावर काम करणाऱ्या आय.एम.एन.सी.आय.- आय.वाय.सी.एन. व इतर संस्थांना महाराष्ट्रात कुपोषण निर्मुलनावर विद्यापीठाची साथ मिळाल्याने त्यांना सर्व समावेशी असा विस्तार करणे शक्य होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. प्रभारी कुलसचिव डॉ. सुनिल फुगारे यांनी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी याबाबतचा ठराव संमत केला असून येत्या शैक्षणिक वर्षापासून सदर विषयाचा अंतर्भाव अभ्यासक्रमात करण्यात येणार असल्याची माहिती सांगितली.

**सही/-**
**प्र. कुलसचिव**